संक्षिप्त फौ. ख. क्र.५३९/२०२५
सरकार -वि.- अनिल सोलंकी
नि.क्र. ६ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - नरेश बापुरावजी रामटेके,
वय ३५ वर्षे, व्यवसाय – डेकोरेशन,
राहणार – जवळी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज कोर्टात हजर आहे. दिनांक २६.०६.२०२५ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला होता. आता मला नि.क्र.७ वरील दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावेळी माझ्यासोबत दशरथ निकुरे होता. त्यादिवशी पोलिसांनी पिंटू आंभोरे यांच्या शेतावरुन अनिल सोलंकीच्या ताब्यातून दहा निपा देशी दारुच्या जप्त केल्या. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला नि.क्र.८ वरील घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला खरा व बरोबर आहे.
सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. मी डेकोरशनचे काम करतो. मी पोलीस पाटील आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस मला जेव्हा बोलवतात तेव्हा मी जातो. मला गावातील माहिती पोलिसांना द्यावी लागते. पोलीस पाटील या नात्याने माझा पोलिसांशी संबंध येतो. मला दि.२६.०६ ला ५.०० ते ६.०० वा. दरम्यान समन्स दिला होता. मला बीट अंमलदार धात्रक यांनी समन्स दिली होता. मला समन्स घटनास्थळावर दिले होते. मला घटनेपूर्वी पंचनामा समन्स दिला नव्हता. मला पोलिसांनी दारु पकडली आहे असा फोन केला म्हणून मी गेलो. मी घटनास्थळावर पोहोचल्यानंतर दुसरा पंच आला होता. दुसऱ्या पंचालाही

पोलिसांनी सुचना दिली होती. दुसऱ्या पंचाला मी सुचना देऊन बोलाविले होते. मी पोहोचल्यानंतर १० मी. आला. मी आपल्या मताने साक्षीदार लागतो म्हणून दुसऱ्या पंचाला बोलाविले होते.

२. मला घटनास्थळाच्या चतुःसिमा माहीत आहे. पुर्वेला पिंटू आंभोरेचे शेत आहे, पश्चिमेला जवळी धापर्ला रोड, उत्तरेला कॅनल व दक्षिणेला भुजबड यांचे शेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तथाकथीत दिवशी घटनास्थळावर गेलो नवहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून काहीही जप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी दुसरा पंच त्यावेळी हजर होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस पाटील असल्यामुळे सर्व सह्या घरी करण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कुठलीही कारवाई झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

हे म्हणणे खरे नाही की,

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १२.०२.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.